# गोटीने केली खोटी

प्रकाशित:

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

© पुनरारंभ

**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# गोटीने केली खोटी

म्हणतात बाळ हट्ट, राज हट्ट व स्त्री हट्ट हे तीनही हट्ट पुरवावेच लागतात. त्यातलाच हा प्रकार केवळ बाळ रडतंय व त्याचा हट्ट तीच गोष्ट पाहिजे या हट्टापायी मातेचा पुनर्ज न्म झाला. त्याची ही घडलेली करूण कहाणी. दरवर्षी श्रावणात नागपंचमीचा सण आला की हमखास आठवण येते ती या घटनेची.

साधारण १०६० सालची घटना. नगर जिल्हयात कोपरगांव तालुक्यात साकरवाडी येथे दि गोदावरी शुगर मिल्स लिमिटेड साखर कारखाना होता. तेथे आम्ही कंपनीच्या आवारातच कारखान्यातील कामगार व अधिकारी वर्ग यासाठी असलेल्या क्वार्टर्स मध्ये रहात होतो. आमच्या क्वार्टर जवळच कंपनीचे जुने गेस्ट हाउस होते. तेथे छोटया छोटया खोल्यांमध्ये कंपनीच्या हंगामात उत्तर प्रदेशमधून आलेले हंगामी कामगार हंगाम संपेपर्यंत एकएकटे रहात होते. गेस्ट हाउसला लागून एक पत्र्याची खोली होती. खोलीजवळ सांडपाण्यावर आळू , पुदीना व गवती चहा फार छान पैकी जमला होता. त्या पत्र्याच्या खोलीमध्ये ३५ वर्षीय शांताबाई नामक परिस्थीतीने गांजलेली परित्यक्ता आपल्या ४ वर्षाच्या मुलासह रहात होती. घरो घरी धुणी भांडयाची कामे करून ती आपला उदरनिर्वा ह करित होती.

श्रावण मास नागपंचमीचा आदला दिवस. संध्याकाळी सर्व घरांची कामे आटोपून ती घरी परतली व घरातील कामास लागली. आळूच्या बेटाजवळच ती भांडी घासण्यास बसली. बाजूला तिचा मुलगा पण काचेच्या गोटयांशी खेळत होता. खेळता खेळता गोटया आळूच्या बेटामध्ये गेल्या व बाळ रडू लागले. आईने त्याची खूप समजूत घालण्याचा प्रयत्न केला. दुसरे खेळणे दिले. पण त्याचे रडणे थांबेना. तो त्याच गोटयांसाठी हट्ट धरून बसला. एवढया अंधारात गोटया सापडणे तर कठिणच होते. पण अंधुक प्रकाशात तिला दोन गोटयांसारखे चकाकणारे गोळे दृष्टीस पडले. गोटया सापडल्याच्या समाधानात तिने त्या काढण्यासाठी हात घातला.

पण हाय रे देवा! गोटया तर दूरच राहिल्या पण एक मोठा फूत्कार टाकित झाडीमध्ये विराजमान झालेल्या नागराजाने एका क्षणात त्या मातेच्या हाताला डंख मारला. शांताबाई घाबरली. दररून घाम फूटला. दुस–या क्षणी ती घाबरून जमिनीवर कोसळली. काय झाले ते तिलाच क्षणभर उमजेना. ती रडू लागली. ओरडू लागली. तिचे ओरडणे ऐकून जवळपासचे सर्व भय्ये जमा झाले. पाहतात तर काय एक भला मोठा ६ फूटी काळा नाग समोर फणा काढून बसला होता. त्याला मारण्याच्या आत जमा झालेली गर्दी व आवाजाने त्याने केव्हा पलायन केले ते कोणालाच कळले नाही.

इकडे शांता बाईची प्रकृति बिघडत चालली होती. तिचा हात काळा निळा पडत होता. हळू हळू नागाचे विष शरिरात भिनू लागले होते. हात पक्का बांधणे, कडू निंबाचा रस पाजणे, लेप लावणे असे अनेक इलाज जो तो आपल्या परिने करू लागला. दरम्यान ही बातमी वा–यासारखी सर्व दूर पसरली. कंपनीचे मॅनेजर श्री.आठवले ज्यांचे घरी ती काम करित होती त्यांचेपर्यंत ही बातमी पोचली. त्या वेळी ते कार्यालयातच होते. तत्परतेने त्यांनी कारवाई करित कंपनीच्या गाडीने तिला जवळच श्रीरामपूर येथे कामगार हॉस्पिटल मध्ये भरती करण्याची आज्ञा केली.

तिथे जाई पर्यंत रात्रीचे नऊ वाजले होते. शरिरात विष चांगलेच भिनल्याचे समजले. डॉक्टरांनी परिक्षणा नंतर परिस्थीती गंभीर असल्याचे सांगीतले. काही तासांचा अवधि जाहीर करित परमेश्वराचा हवाला देऊन उपचार सुरू केले.

परमेश्वरी कृपेने अवधि टळला व सुदैवाने शांताबाईचे प्राण वाचले. सोबत गेलेल्या सर्वानी सुटकेचे श्वास सोडले व दुसरे दिवशी सकाळी ११ वाजता तिला परत घरी आणले.

निराधार शांताबाईच्या केवळ प्रेमळ व विनयशील स्वभावामुळेच तिच्या मदतिला सर्व धावून आले. अन्यथा तिचे वर दुर्धर प्रसंग ओढवला असता.

कोणी आपल्या रक्ताच्या नात्याचे असो वा मानलेल्या नात्याचे केवळ प्रेम विनयशीलता व सुस्वभावमुळे जग जिंकता येते.